दिव्य मराठी

लातूर जिल्हा 02-02-2024

# नव शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या हिताचे

## सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयात स्कूल कनेक्ट उपक्रमात पिनमकर यांचे प्रतिपादन




प्रतिनिधी | लातूर

नवीन शैक्षणिक धोरण हे चार भिंती ओलांडत आणि पुस्तकी न राहता ज्ञानाची कक्षा वृंदावणारे आहे, म्हणून येऊ घातलेले नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करणारे ठरेल. आता विद्यार्थ्यास एकाच वेळेस एकापेक्षा अधिक पदवी धारण करणारे असेल, असे मत डॉ. पिनमकर यांनी व्यक्त केले. श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित स्कूल कनेक्ट अभियान २०२४ या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील, समन्वयक प्रा. दादासाहेब लोंढे, प्रा. अनिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पिनमकर म्हणाले की, या नवीन शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षणाचे प्रमाण 50% वाढणार असून, नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात लवचिकता आली आहे. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ.अजय पाटील म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण नोकरी मागणारे नसून, नोकरी देणारे विद्यार्थी घडवण्याची आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी, पालकांनी नवे शैक्षणिक धोरण समजून घेण्याचे आवाहन याप्रसंगी उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.सविता यादव यांनी केले. प्रा. अनिता गायकवाड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. उपस्थितांचे आभार प्रा. बापू गायकवाड यांनी मांडले.